# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)


दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
०२०- २५६०१२५८
०२०- २५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: dyracademic@unipune.ac.in


संदर्भ : CCO/2165

दिनांक : 13/10/2018

प्राचार्य / सचिव
सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक.

विषय : महाराष्ट्र राज्य प्राध्यापक महासंघाने दि. २५ सप्टेंबर, २०१८ ते दि. १० ऑक्टोबर, २०१८ या काम बंद आंदोलनाच्या कालावधीमध्ये झालेल्या शैक्षणिक नुकसान भरून काढण्याबाबत....

संदर्भ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीय व महाविद्यालयीन अध्यापक संघटना (स्पुक्टो) यांचे दि. ११ ऑक्टोबर, २०१८ रोजीचे पत्र.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य प्राध्यापक महासंघाच्या आदेशान्वये या विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालये / संस्थांमधील शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी दि. २५ सप्टेंबर, २०१८ ते दि. १० ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात आले होते. सदर आंदोलन हे महासंघाच्या बैठकीमध्ये चर्चा होऊन मंत्री महोदयांचे आवाहन व विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता मागे घेण्याचा निर्णय झाला असल्याचे उपरोक्त संदर्भीय पत्रात नमूद केले आहे.

तरी महाविद्यालयातील शिक्षकांनी अधिकचे तास घेऊन संप कालावधीत झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढण्याच्या दृष्टीने संबंधित महाविद्यालयातील प्राचार्यांनी आपल्या स्तरावर दि. २५ सप्टेंबर, २०१८ ते दि. १० ऑक्टोबर, २०१८ या आंदोलन काळाचे वेळापत्रक तयार करून परीक्षेपूर्वी अभ्यासक्रम पूर्ण होईल याची काळजी घ्यावी. तसेच संप कालावधीतील शैक्षणिक नुकसान भरून काढले असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सादर करावे व त्याची प्रत विद्यापीठास सादर करावी.

कळावे,

आपला,

सहायक कुलसचिव
(शैक्षणिक विभाग)